# Newspaper: Maharashtra Times

# Article Date: 01st September 2018

# Article Regarding Enigma Escapade 2018 (Post Event Article)

## 'एनिग्मा'वर छाप गेमिंगची



राघवेंद्र महाबळेश्वरकर, पोदार कॉलेज

सामाजिक जाणीवेचं भान ठेवून त्यानुसार मदत करणारे उपक्रम, दोन-तीन महिन्यांपासूनची तयारी, १५०हून अधिक स्वयंसेवक, अकरा विभागांची मेहनत, ३२ इंव्हेंट्स अशा सर्व तामझामासहीत पोदार कॉलेजचा एनिग्मा फेस्टिव्हल नुकताच पार पडला. फेस्टच्या पहिल्या दिवशी एनिग्माच्या प्रथेप्रमाणे गणपती बाप्पाच्या आरतीनं सुरुवात झाली आणि फेस्टिव्हल ट्रेंडपेक्षा थोडंसं वेगळं करत 'वॉर ऑफ डीजे'नं एनिग्माची सुरुवात करण्यात आली. एनिग्माचं वैशिष्ट्य म्हणजे या तीन दिवसात मराठी वाङ्मय मंडळाच्या विद्यार्थ्यांकडून भरवला जाणारा 'ऋतुरंग' महोत्सव. याच्या अंतर्गत शास्त्रीय संगीताची स्पर्धा घेण्यात आली. या फेस्टचा 'महाराष्ट्र टाइम्स' मीडिया पार्टनर होता.

### फेस्टिव्हल्सचा संगम

पोदार कॉलेजची ओळख समजला जाणाऱ्या एनिग्मा फेस्टिव्हल म्हणजे 'एनिग्मा', 'ऋतुरंग' आणि 'क्विझार्स' या तीन फेस्टिव्हलचा तिहेरी संगम असतो. त्यामुळे जवळ-जवळ २०० हून अधिक विद्यार्थी विविध विभागांमध्ये स्वयंसेवक म्हणून काम करत होते.

### बॅटलची चुरस

एनिग्मामध्ये झालेल्या डान्स बॅटलला ९३ स्पर्धक सहभागी झाले होते. वयाची अट नसल्यामुळे विविध कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपासून ते व्यावसायिकरित्या डान्स करणाऱ्या तरूणांनी यात सहभाग घेतला होता. 'डान्स बॅटल'मुळे स्पर्धकांना एक नवीन चुरस पाहायला मिळाली.



कॅमेरा प्रेमींसाठी फोटोग्राफी, वक्त्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा, लेखकांसाठी लिखाण स्पर्धा, खेळाडूंसाठी कबड्डी, चित्रकारांसाठी वारली पेंटिंग असं प्रत्येक कलेला प्राधान्य देण्यात आलं होतं. कलाकारातील अप्रतिम कलेला वाव देत एनिग्माच्या टीमनं इव्हेंट्स आयोजित केले होते. या सर्व इव्हेंट्समध्ये आकर्षणाचा विषय ठरला तो म्हणजे 'अमेझिंग रेस' या अंतर्गत विद्यार्थ्यांना दिलेल्या वेळेत विविध आव्हानं पूर्ण करायची होती. तीन दिवसीय स्पर्धेमध्ये 'बॉलिवूड डान्स', 'स्वर नक्षत्र', 'कबड्डी', 'वॉर ऑफ डीजे'ला प्रेक्षकांकडून भरघोस प्रतिसाद मिळाला. या सर्व इव्हेंट्सचं परीक्षण करण्यासाठी मराठी कलाक्षेत्रातील अभिषेक नलावडे आणि अपूर्वा गोखले उपस्थित होते. जवळपास दोन हजार विद्यार्थ्यांची उपस्थिती, अनेक दिग्गज मंडळी, वैविध्य पूर्ण इव्हेंट्स आणि स्पर्धकांच्या भरघोस उत्साहामध्ये 'एनिग्मा' पार पडला. फेस्ट दणक्यात साजरा करण्यासोबत सामाजिक भानही जपण्यात आलं. यावेळी कागदी पिशव्यांचं वाटपही करण्यात आलं.

### गेमिंग स्पर्धेला सर्वाधिक वाव

तीन दिवसामध्ये पार पडलेल्या एनिग्माची शान ठरले ते म्हणजे गेमिंग इव्हेंट्स. 'काऊंटर स्ट्राइक', 'फिफा वर्ल्ड कप' यासारख्या इव्हेंट्सला दोन दिवसात दोनशेहून अधिक मुलांनी सहभाग घेतला. या इव्हेंट्ससाठी लागणारा मोठा सेटअप स्पर्धकांना उपलब्ध करून देण्यात आला होता. तर काही स्पर्धा सायबर कॅफेमध्ये घेण्यात आला. तरूणाईला असलेलं गेमिंगचं वेड या स्पर्धांना मिळालेल्या भरघोस स्पर्धक संख्येवरून दिसून आलं.